# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
## (पुर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक क्र.224/ २०२५

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परिक्षेत्रातील पुणे, अहिल्यानगर व नाशिक या तिन्ही जिल्हयातील सर्व महाविद्यालयांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, ज्या अध्यापकांनी दि. ११ जुलै, २००९ पूर्वी एम. फिल. पदवी पूर्ण केलेली आहे आणि दि. १४ जून, २००६ रोजी किंवा त्यापूर्वी नियुक्ती झालेल्या नियमित/कायमस्वरूपी सेवेत असलेल्या अध्यापकांना विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांनी त्यांचे दि. ०२ जुलै, २०२५ रोजीच्या पत्रान्वये नेट मधून सूट देण्याचा निर्णय घेतलेला असून त्यासोबत यादी प्रसिद्ध केलेली आहे. त्याअनुषंगाने संबंधित अध्यापकांची कॅस अंतर्गत पदोन्नती करणेसाठी विद्यापीठ अनुदान आयोगाने प्रसिद्ध केलेल्या यादीचे अवलोकन करून त्यामध्ये काही त्रुटी असल्यास सदर त्रुटींची पूर्तता सदरचे परिपत्रक निर्गमित झाल्यापासून दि. २८/०८/२०२५ पर्यंत महाविद्यालयामार्फत लेखी स्वरूपात कागदपत्रांसह या कार्यालयाचे परिपत्रक २१६/२०२५, दि. २३ ऑगस्ट, २०२५ अन्वये कळविण्यात आलेले होते.

तथापि, बऱ्याचशा अध्यापकांनी सदर त्रुटींची पूर्तता केलेली नसल्याचे दिसून येत आहे. ज्या अध्यापकांनी अद्यापही त्रुटींची पूर्तता केलेली नाही अशा अध्यापकांना त्रुटींची पूर्तता करणेसाठी या परिपत्रकाद्वारे दि. २९ ऑगस्ट, २०२५ ते दि. ०२ सप्टेंबर, २०२५ या कालावधीकरीता मुदतवाढ देण्यात येत आहे.

29/8/2025

(स. द. डावखर)
उपकुलसचिव

जावक क्र. सीसीओ/ 3538
दिनांक – 29 ऑगस्ट, २०२५